# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा. क्र./ गों. वि. /म. वि. वि. वि./ १३०६/२०२३ दि. २४/०८/२०२३

## परिपत्रक

**विषय :- दिनांक १४ जुन २००६ पुर्वी विहित निवड समितीमार्फत नियुक्त व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या एम. फील. अर्हताधारक अध्यापकांना नेट/सेट अर्हतेमधुन सुट मिळण्यासाठीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**संदर्भ :**१. एम. फील. धारक प्राध्यापक यांचे दिनांक १७/०८/२०२३ रोजीच्या प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने.
२. गोंडवाना विद्यापीठ यंग टिचर्स असोसिएशन यांचे पत्र क्रमांक ०६४/२०२३ दिनांक २४/०७/२०२३.
३. महाराष्ट्र राज्य एम. फील. पात्रताधारक प्राध्यापक संघर्ष समिती, मुंबई यांचे दिनांक १०/०७/२०२३ रोजी प्राप्त पत्र.
४. गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच यांचे पत्र क्रमांक गोंविशिमं/१/२०२३ दिनांक २४/०७/२०२३.
५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकिर्ण. २२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दिनांक १६/०२/२०२३.
६. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक F-९-१२/२०२० (PS/MISC) दिनांक ०५/०९/२०२२.

विद्यापीठाशी संलंग्नित सर्व अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना कळविण्यात येते कि, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भीय पत्र क्रमांक ६ अन्वये दिनांक १४ जुन २००६ पुर्वी एम. फील.अर्हतेवर विहीत निवड समितीच्या माध्यमातुन नियुक्त झालेल्या व ज्या अर्हताधारकांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असतांना दिनांक ०१ जानेवारी १९९४ ते दिनांक ११ जुलै २००९ या कालावधीत एम. फील. अर्हता धारण केलेली आहे, अशा अध्यापकांना नेट/सेट अर्हतेतुन सुट मिळण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यासाठी संदर्भीय पत्रानुसार विविध संघटनांकडुन निवेदनाव्दारे विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठ निवड समितीव्दारे विहित प्रक्रियेनुसार दिनांक १४ जुन २००६ पुर्वी नियुक्त एम. फील. अर्हताधारक अध्यापक ज्यांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असतांना दिनांक ०१ जानेवारी १९९४ ते दिनांक ११ जुलै २००९ या कालावधीत एम. फील. हि अर्हता धारण केलेली आहे व ज्यांना नेट अर्हतेतुन अद्यापपर्यंत विद्यापीठ अनुदान आयोगाने सुट दिलेली नाही, अशा अध्यापकांचे स्वतंत्र प्रस्ताव विहित नमुन्यामध्ये खालील साक्षांकित कागदपत्रासह **दिनांक २२/०९/२०२३** पर्यंत विद्यापीठाचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागात सादर करावेत व त्याची Soft Copy PDF स्वरुपात college.section@unigug.ac.in या ई-मेल वर पाठवावी.

सदर प्रस्तावासोबत संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने खालील साक्षांकित कागदपत्रासह परिपुर्ण प्रस्ताव सादर करावेत.

१. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांचेकडुन प्राप्त झालेले पद मान्यतेचे पत्र.
२. बिंदु नामावली प्रत.
३. सदर पदाची जाहिरात.
४. विद्यापीठ निवड समिती अहवाल.
५. नियुक्ती आदेश.
६. रुजु अहवाल.
७. शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे (उदा.पदवी, पदव्युत्तर पदवी, एम. फील. गुणपत्रिका व पदवीसह ईतर तत्सम दस्ताऐवज)
८. मागास प्रवर्गातील उमेदवार असल्यास जात वैधता प्रमाणपत्र.
९. विद्यापीठाने अध्यापक म्हणुन मान्यता दिलेले पत्र.
१०. संबंधित अध्यापकांच्या नियुक्ती संदर्भात तक्रार निवारण समिती, विद्यापीठ आणि महाविद्यालयीन न्यायाधिकरण, मा. उच्च न्यायालय, मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ नसल्याचे शपथपत्र/प्रमाणपत्र सादर करावे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे सादर करु नयेत.

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सदर परिपत्रक महाविद्यालयातील सर्व संबंधित अध्यापकांच्या निदर्शनास आणुन देण्यात येऊन उक्त अध्यापकांचे प्रस्ताव संपुर्ण दस्ताऐवजासह प्राचार्यांनी साक्षांकित करुन विहीत वेळेत विद्यापीठास सादर करावे.

मा. प्र- कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार

(देवेंद्र एम झाडे)
उपकुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा.प्राचार्य,
सर्व संलंग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी :-

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

UNIVERSITY GRANT COMMISSION

BAHADUR SHAH ZAFAR MARG

NEW DELHI

# PROFORMA FOR SEEKING RELAXATION IN THE MINIMUM QUALIFICATIONS PRESCRIBED BY UGC FOR APPOINTMENT TO THE POST OF LECTURER **(ON THE BASIS OF M.PHIL FOR UG LEVEL TEACHING)**

(The Universities and Colleges should furnish the following information for obtaining approval of the Commission while seeking relaxation in qualifications as per UGC regulations 1991)

1. Name of the University :

2. Name of the College :

3. Name of the candidate for whom the Relaxation is being sought :

4. Subject in which the candidate is Recruited :

5. Academic qualifications of the candidate :

| Level of Degree | Name of Degree | Name of University | Year of passing | Marks/Division |
|---|---|---|---|---|
| Graduate | | | | |
| Post-Graduate | | | | |
| M.Phil | | | | |

6. Whether the post was approved? :

7. The name of the approving authority :

8. The extent of relaxation/ exemption Sought :

9. Special reasons for seeking exemption :

10. Whether the post was advertised in the leading newspapers, Employment News, Rojgar Samachar and Doordarshan etc.(Mention, Name of the News papers & date of Advertisement) :

11. Whether the post was reserved for SC / ST or any other category :

12. Total number of candidate called for Interview along with the candidate :

13. Number of candidates interviewed along with the candidate :

14. Number of candidates having NET qualifications out of the interviewed Candidates along with this candidate :

15. Whether the candidate has more than 55% marks at Master's level. :

16. Whether the candidate belongs to SC / ST category

17. If SC / ST, Whether the candidate has More than 50% marks at Master's level :

18. Whether the composition of the Selection committee was as per UGC's norms :

19. Number of members present at the interview :

20. Report of the selection committee with respect to this candidate :

21. Date of selection committee meeting :

22. Date of appointment :

23. University approval number :

24. Number of years the candidate continued after appointment pursuant to the selection :

Verification: Verified at ..................................... on .................... day of .............. 2023 , that the information furnished above is correct to the best of my knowledge and nothing has been concealed.

Signature of the Principal
With seal

Signature of the Registrar
with seal